मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात; समता व न्यायाचा संदेश

## महापालिकेकडून विविध ठिकाणी अभिवादन; समता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा विचार हा आपल्या संविधानाचा पाया आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या मंत्रामुळे समाजात परिवर्तन घडले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांना केवळ स्मरणात न ठेवता आचरणात आणणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस, भीमसृष्टी तसेच एच. ए कॉलनी आणि दापोडी येथील पुतळ्यास महापौर रवि लांडगे तसेच महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

विविध ठिकाणच्या या अभिवादन प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, माजी महापौर योगेश बहल,नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन,कुशाग्र कदम, डॉ. सुहास कांबळे, मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, माई काटे, वर्षा जगताप, यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या कार्याचा जागर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ११ ते १७ एप्रिल या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' आणि 'विचार प्रबोधन पर्व' आयोजित करण्यात आले आहे. या पर्वाच्या माध्यमातून महापुरूषांच्या विचारांचा प्रसार करून समाजात जागर निर्माण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. या उपक्रमांमध्ये शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन समता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारी यांचा संदेश अधिक व्यापक करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन देखील महापौर रवि लांडगे यांनी यावेळी केले.

यावेळी महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे यांनी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करून अभिवादन केले..

### अनोखी मानवंदना..

**» पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने हेलिकॉप्टरच्या माध्यमातून भव्य पुष्पवृष्टी करण्यात येत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखी मानवंदना देण्यात आली. आकाशातून होत असलेल्या या पुष्पवृष्टीमुळे परिसरात उत्साहपूर्ण आणि भारावलेले वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित नागरिकांनी या अनोख्या उपक्रमाचा मोठ्या उत्साहात साक्षीदार होत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला अभिवादन केले.**

# मेट्रोसाठी जिजाऊ उड्डाणपूल पाडणार; पिंपरीत चर्चा रंगली

## सुधारित DPR मध्ये 34 स्थानके; भोसरीत वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प ते चाकण मेट्रोच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) आराखड्यानुसार भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल पाडण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून सुधारित आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर राज्य व केंद्राची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू होणार आहे



पूर्वीच्या आराखड्यात 31 मेट्रो स्टेशन होते. या सुधारित आराखड्यात एकूण 34 मेट्रो स्टेशन असणार आहेत. एकूण 47.215 किलोमीटर अंतराचा मार्ग असणार आहे. हा मार्ग भोसरी येथून जाणार आहे. त्यामुळे भोसरी आणि लांडेवाडी येथे मेट्रो स्टेशन असणार आहे. त्या सुधारित डीपीआरनुसार या प्रकल्पास एकूण 12 हजार 937 कोटी 23 लाख खर्च अपेक्षित आहे. पूर्वी प्रकल्पाचा हा खर्च 10 हजार 383 कोटी 89 लाख रुपये इतका होता.

या सुधारित डीपीआर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सादर केला जाणार आहे. महापालिकेच्या मंजुरीनंतर हा आराखडा राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. तेथून केंद्राकडून आराखडा पाठवला जाईल. तेथे अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल.

दरम्यान,महापालिकेने भोसरी येथे राजमाता जिजाऊ उड्डाणपूल बांधला होता. त्यासाठी सुमार 99 कोटी 58 लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. तसेच, शीतल बाग पाचचारी पुलासाठी 7 कोटी खर्च झाला आहे. हे दोन्ही पूल मेट्रो मार्गासाठी तोडले जाणार आहे. त्यामुळे येथील वाहतूककोंडी सुटणार की वाढणार, असे प्रश्न उपस्थित केला जात आहे.


निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प ते चाकण मेट्रोच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) आराखड्यानुसार भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल पाडण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून सुधारित आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर राज्य व केंद्राची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू होणार आहे

# पीएमआरडीएचा विक्रम; 95 दिवसांत 14 मजली इमारत पूर्ण

## चिखली प्रकल्पाची आशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद; आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) गृहनिर्माण आणि अभियांत्रिकी क्षेत्रात जागतिक स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा नवा झेंडा फडकावला आहे. चिखली येथील 'सेक्टर १२' गृहनिर्माण प्रकल्पात अवघ्या ९५ दिवसांत १४ मजली इमारत उभी करण्याचा भीमकाय पराक्रम 'पीएमआरडीए'ने केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेत 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' आणि 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये या विक्रमाची सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यात आली आहे




विशेष म्हणजे, 'पीएमआरडीए'ने यापूर्वीचा आपलाच १०० दिवसांचा जुना विक्रम मोडीत काढत बांधकामाचा नवा मापदंड प्रस्थापित केला. सोमवारी (दि. 13) चिखली येथील प्रकल्पस्थळी आयोजित दिमाखदार सोहळ्यात 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'चे परीक्षक अशोक अदाक यांनी अधिकृत प्रमाणपत्र व पदक देऊन 'पीएमआरडीए'चा गौरव केला. प्राधिकरणाच्यावतीने मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी हा बहुमान स्वीकारला.

'पीएमआरडीए'चे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली हा मैलाचा दगड गाठण्यात आला. हे अशक्यप्राय काम पूर्ण करण्यासाठी 'बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी' या कंपनीच्या सुमारे ९ हजार कामगारांनी तीन शिफ्टमध्ये अहोरात्र काम केले. अत्याधुनिक 'प्रीकास्ट आरसीसी' तंत्रज्ञानामुळे (३-एस सिस्टिम – SAFETY, STRENGTH AND SPEED) गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता ही इमारत विक्रमी वेळेत पूर्ण झाली. ही वास्तू पूर्णपणे भूकंपप्रतिरोधक असून शाश्वत नागरी विकासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे.

यापूर्वी मार्च २०२६ मध्ये 'पीएमआरडीए'ने १०० दिवसांत इमारत बांधून विक्रम केला होता. मात्र, अवघ्या एका महिन्यात पुन्हा स्वतःचेच रेकॉर्ड सुधारत ९५ दिवसांचे नवे लक्ष्य गाठले आहे. यापूर्वी बांधकाम क्षेत्रातील दिग्गज 'एल अँड टी' कंपनीच्या नावावर ९६ दिवसांत १२ मजली इमारत बांधल्याची नोंद होती; त्यावर आता 'पीएमआरडीए'ने मात केली आहे.

यावेळी मुख्य वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे, बांधकाम परवानगी विभागाचे संचालक अविनाश पाटील, कार्यकारी अभियंता विद्याधर शिंदे, उपअभियंता रश्मी पाटील, शिर्के ग्रुपचे उपाध्यक्ष वाय. पी. काजळे, उपमुख्य अधिकारी एन. एम. कदम, व्यवस्थापक जे. सी. राक्षे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता मिडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार एन. एम. कदम यांनी मानले.

### दृष्टिक्षेपात विक्रमी बांधकाम

- इमारत : १४ मजली निवासी इमारत (डी-३) LIG
- एकूण क्षेत्रफळ : ९४,७२२ चौरस फूट
- सदनिका : ११२ (२ बीएचके)
- कालावधी : केवळ ९५ दिवस
- तंत्रज्ञान : प्रीकास्ट आरसीसी (इंडस्ट्रियलाइज्ड ३-एस सिस्टिम)

"पीएमआरडीएच्या सेक्टर-१२ येथील गृहनिर्माण प्रकल्पात आम्ही 'मिशन ९५ डेज' हे मोठे आव्हान स्वीकारले होते. अभियांत्रिकी कौशल्य आणि अचूक नियोजनाच्या जोरावर १४ मजली 'डी-३' LIG इमारत केवळ ९५ दिवसांत पूर्ण करून आम्ही हा टप्पा गाठला आहे. ही यशस्वी अंमलबजावणी प्रामुख्याने '३-एस प्रीफॅब टेक्नॉलॉजी', 'झिरो लॅग शेड्युलिंग' आणि अहोरात्र चालणाऱ्या 'थ्री-शिफ्ट वर्किंग' मॉडेलवर आधारित आहे. या प्रकल्पात फॅक्टरी-मेड प्रीकास्ट घटकांचा वापर केल्यामुळे बांधकामाचा वेग वाढला, तसेच गुणवत्तेतही कमालीची समानता राखली गेली आणि साहित्याची नासाडी कमी झाली. बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर कडक गुणवत्ता नियंत्रण सुरक्षा मानके आणि डिजिटल पाळत ठेवण्यात आली. हा प्रकल्प केवळ विक्रम प्रस्थापित करण्यापुरता मर्यादित नसून, भविष्यातील मोठ्या प्रमाणावरील परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी हे एक 'स्केलेबल मॉडेल' ठरणार आहे. गुणवत्तेचा दर्जा राखून सर्वसामान्यांना विक्रमी वेळेत हक्काची घरे उपलब्ध करून देणे हाच आमचा मुख्य उद्देश असून, आगामी काळातही अशा तंत्रज्ञानाधारित प्रकल्पांना प्राधिकरणाचे प्राधान्य राहील."

- रिनाज पठाण, मुख्य महानगर अभियंता, पीएमआरडीए

# पिंपरी RTO परिसरात भंगार वाहनांचा ढिग; नागरिकांची गैरसोय

## जप्त वाहनांची विल्हेवाट नाही; जागेअभावी आणि अस्वच्छतेमुळे समस्या गंभीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात सध्या बेवारस आणि जप्त केलेल्या वाहनांचा मोठा साठा झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून पडून असलेली ही वाहने आता पूर्णपणे गंजून भंगारात परिवर्तित झाली असून, संपूर्ण परिसराला अक्षरशः भंगार वाहनांच्या मार्केटचे स्वरूप प्राप्त झाले आहे.



या परिस्थितीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आरटीओ कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांनी प्रशासनाच्या या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कार्यालयाच्या परिसरात सर्वत्र उभ्या असलेल्या जुन्या वाहनांमुळे जागेची कमतरता निर्माण झाली आहे. तसेच, या वाहनांमुळे परिसरात अस्वच्छता वाढून आरोग्याचा प्रश्नही निर्माण होत आहे

नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करुन ती जप्त केली जातात, परंतु त्यांची पुढील प्रक्रिया वेळेत होत नाही. अनेक वाहने वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी पडून असल्याने त्यांची अवस्था भंगारासारखी झाली आहे. नवीन जप्त वाहनांसाठी जागा नसल्याने कार्यालयाच्या कामकाजात अडथळे निर्माण होत आहेत.

वैध कागदपत्रांचा अभाव, परवाना नियमांचे उल्लंघन, हेल्मेट किंवा सीटबेल्ट न वापरणे, मोबाईलवर बोलणे, अतिवेग व मद्यपान करुन वाहन चालविणे तसेच इतर शासकीय शुल्क न भरत असल्यानेही आरटीओने वाहने जप्त केली आहेत. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आणि कार्यालयाच्या सुयोग्य कामकाजासाठी या भंगार वाहनांचा प्रश्न लवकर सोडवणे गरजेचे आहे.

### भंगार वाहनांचा प्रश्न सोडविणे गरजेचे

- सध्या पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयाची परिस्थिती चिंताजनक बनली असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आणि कार्यालयाच्या सुयोग्य कामकाजासाठी या भंगार वाहनांचा प्रश्न लवकर सोडवणे गरजेचे आहे.

# प्रभाग समिती निवडणूक लांबणीवर ? नगरविकासने मागविला अहवाल

## क्षेत्रीय कार्यालय पुनर्रचनेत भौगोलिक सुसंगतता नसल्याचा आरोप; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी मुख्यमंत्र्यांकडे केली स्थगितीची मागणी.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने केलेल्या क्षेत्रीय कार्यालय व प्रभाग समिती पुनर्रचनेत त्रुटीं असल्याचा आरोप करत समिती रचनेला स्थगिती देण्याची मागणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. या मागणीनुसार तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाने ७ एप्रिल रोजी पालिकेला दिले आहेत. यामुळे, २१ एप्रिल रोजी होण्याऱ्या क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्षांची निवड लांबणीवर पडण्याची स्पष्ट चिन्हे आहेत.

क्षेत्रीय कार्यालये व प्रभाग समित्या या मिनी महापालिका म्हणून ओळखल्या जातात. त्याची निवडणूक २१ एप्रिल रोजी होणार होती. त्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाने अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांची पीठासन अधिकारी म्हणून नियुक्तीही केली आहे. महापालिकेत राष्ट्रवादीचे दुसऱ्या क्रमांकाचे २७ नगरसेवक असूनही त्यांना क्षेत्रीय कार्यालय पुनर्रचनेनंतर एकाही प्रभाग समितीचे अध्यक्षपद मिळणार नाही.



### पुनर्रचनेत विसंगतींचा आरोप

**» महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेत भौगोलिक सलगता व नागरिकांच्या सोयीचा विचार झालेला नाही, असा आरोप करण्यात आला आहे. विश्रांतवाडी, धानोरी, खराडी-वाघोली येथील नागरिकांना दूरच्या कार्यालयात जावे लागत आहे. यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांगांना त्रास होत असल्याची तक्रार पत्रात नमूद करण्यात आली आहे.**

दुसरीकडे काँग्रेसचे १५ सदस्य असतानाही त्यांना एक समिती मिळणार आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्वस्थता असून पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे व्यक्त केल्या. त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी वरील पत्र मुख्यमंत्र्यांना पाठवले आहे.

पालिकेने केलेल्या १५ क्षेत्रीय कार्यालये आणि परिसीमा विभागांच्या पुनर्रचनेमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. या बाबी उपमुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात नमूद केल्या आहेत. तसेच जनहिताच्या दृष्टिने सदर प्रभाग रचनेस स्थगिती देऊन नवीन प्रभाग रचना करण्याचा संबंधितांना आदेश द्यावा अशीही मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. त्यामुळे आपण आपला अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

महापालिकेने १५ क्षेत्रीय कार्यालये आणि परिसीमा विभागांची पुनर्रचना केली आहे. या प्रक्रियेत भौगोलिक सलगता आणि नैसर्गिक अंतराचा विचार केलेला नाही. यामुळे पुणेकरांना दैनंदिन कामांसाठी घरापासून लांब असलेल्या क्षेत्रीय कार्यालयात जावे लागत आहे. त्यात, विश्रांतवाडी व धानोरी (प्रभाग क्र. १ व २) हे भाग नैसर्गिकरित्या येरवडा क्षेत्रीय कार्यालयाजवळ असताना, त्यांना दूरच्या नगर रोड कार्यालयाला जोडण्यात आले आहे.

खराडी-वाघोली (प्रभाग क्र. ४) येथील नागरिकांना नगर रोड कार्यालय जवळ असताना, त्यांना तेथून ७ कि.मी. दूर असलेल्या येरवडा कार्यालयात जावे लागत आहे. अशा प्रकारच्या विसंगत रचनेमुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग व्यक्तींना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ही रचना अत्यंत एकांगी असून त्यामध्ये भौगोलिक सुसंगतता व लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेतलेले नाही अशी तक्रार पत्रात केली आहे.

### प्रभाग रचनेवर स्थगितीची मागणी

**» महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय व प्रभाग समिती पुनर्रचनेत त्रुटी असल्याचा आरोप करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. जनहिताच्या दृष्टीने सध्याच्या रचनेला स्थगिती देऊन नव्याने रचना करण्याची मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाने महापालिकेला तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**

### अध्यक्ष निवडणूक लांबणीवर?

**» २१ एप्रिल रोजी होणारी प्रभाग समिती अध्यक्षांची निवडणूक आता लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. क्षेत्रीय कार्यालये व प्रभाग समित्या 'मिनी महापालिका' म्हणून ओळखल्या जातात. निवडणुकीसाठी पीठासन अधिकारी म्हणून सतीश राऊत यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र पुनर्रचनेवर वाद निर्माण झाल्याने संपूर्ण प्रक्रियेवर अनिश्चितता निर्माण झाली आहे.**

---

# पुणेकरांसाठी मोठी बातमी! कात्रज-कोंढवा रस्त्याचा मार्ग मोकळा

## अनधिकृत रेडिमिक्स काँक्रीट प्रकल्पांवर प्रशासनाने कडक कारवाई,सात अनधिकृत रेडिमिक्स काँक्रीट प्रकल्पांवर फिरवला हातोडा

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पाला अखेर गती मिळाली असून उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत अंतिम निवाडा प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात ५० मीटर रुंदीचा रस्ता करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या भूसंपादनासाठी मंत्रालयात अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल व वने) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत अंतिम निवाडा प्रस्तावास मान्यता देण्यात आल्याने भूसंपादन निवाडा जाहीर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या सुमारे



दहा वर्षांपासून रखडलेला हा प्रकल्प आता मार्गी लागणार आहे. सुमारे ३.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात पहिल्या टप्प्यात १२९ मिळकतींमधील सुमारे ५२,६३० चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन करण्यात येणार आहे. ५० मीटर रुंदीच्या रस्त्यात मुख्य रस्ता, दोन्ही बाजूंना सेवा रस्ते, पावसाळी वाहिन्या (यू-ड्रेन) आणि माउलीनगर येथे ग्रेड सेपरेटरचा समावेश आहे.

शहरातील दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा आणि मोठ्या प्रमाणावर जड वाहतूक असलेला हा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रस्तावित ८४ मीटर रुंदीच्या विकास आराखड्यातील रस्त्यांपैकी पहिल्या टप्प्यात ५० मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव महापालिका प्रशासन व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखालील भू-संपादन विभागामार्फत तयार करून विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता.

उड्डाणपुलाच्या कामालाही गतीदरम्यान, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राजस चौक येथे उभारण्यात येणारा उड्डाणपूल सुमारे २६० मीटरपर्यंत येत आहे. या पुलाच्या उतारासाठी वाहतूक वळविण्याच्या दृष्टीने सुमारे ४०० मीटर लांबीचे सेवा रस्ते विकसित करण्यात येत असून काही काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर एप्रोच रोडचे रखडलेले कामही मार्गी लागणार आहे. त्यामुळे आता शासनाची औपचारिक मान्यता मिळाल्यानंतर तातडीने जमिनींचा ताबा घेऊन प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरू करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

**"कात्रज-कोंढवा रस्ता शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा असून भूसंपादन प्रक्रिया अपूर्ण राहिल्यामुळे प्रकल्प प्रलंबित होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाकडे लक्ष घालून तो गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महापालिका व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून भूसंपादन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यात आली असून पहिल्या टप्प्याला मान्यता मिळाली आहे."**

**- नवल किशोर राम, महापालिका आयुक्त**

# चांडोलीत दफनभूमीवरील अतिक्रमण जमीनदोस्त

## प्रशासनाकडे दुर्लक्षाचा आरोप; कार्यकर्त्यांनी थेट कारवाई करत कारखान्याचे शेड पाडले

**पुणे | प्रतिनिधी**

चांडोली (ता. राजगुरुनगर) येथील मागासवर्गीय दफनभूमीवरील अतिक्रमण भीम शक्ती संघटनेच्या संतप्त कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. १४) जमीनदोस्त केले. मागासवर्गीय दफन भूमीची जागा असताना येथे सिमेंट खांब, खिडक्या व इतर साहित्य बनविण्याचा कारखाना सुरू करण्यात आला होता.

सर्व शासकीय कार्यालयांना निवेदन देऊन, आंदोलन करून उपयोग झाला नसल्याच्या पार्श्वभूमीवर भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक विजय डोळस यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी थेट अतिक्रमण विरोधी कारवाई हातात घेऊन ठोक आंदोलन केले.



### विजय डोळस यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

» या कारवाईचे नेतृत्व विजय डोळस यांनी केले. सुमारे २०० कार्यकर्त्यांनी भर उन्हात एकत्र येत अतिक्रमणाविरोधात जोरदार आंदोलन केले. प्रशासन आणि पोलिसांविरोधात घोषणाबाजी करत परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. संबंधित जागा दफनभूमीसाठी राखीव असूनही अतिक्रमण झाल्याचा आरोप करण्यात आला.

जुन्या पुणे-नाशिक महामार्गाच्या दर्शनी ठिकाणी आणि भीमा नदीच्या काठावर ६८ गुंठे ही जागा आहे. यातील १७ गुंठे जागा खासगी मालकाची असुन उर्वरित ५१ गुंठ्यांत अतिक्रमण करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. निवृत्त न्यायमूर्ती बी. जी. कोळसे, विजय डोळस यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाल्यावर जागेचे तारेचे कुंपण उखडून हा परिसर मागासवर्गीय नागरिकांसाठी दफनभूमी म्हणुन खुला करण्यात आला होता. काही कालावधीनंतर पुन्हा अतिक्रमण झाले. या प्रकरणी सन २०१२ मध्ये देखील मोठे आंदोलन झाले होते.

त्यावर कारवाई होत नसल्याने मंगळवारी कार्यकर्त्यांनी थेट अतिक्रमण विरोधी कारवाई केली. या कारवाईत कारखान्याचे शेड जमीनदोस्त करण्यात आले. याशिवाय कारवाईनंतर कार्यकर्त्यांनी या जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विधिपूर्वक स्थापना केली. यावेळी शासकीय अधिकारी, पोलिस प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती राजगुरुनगर शहर परिसरात उत्साहात साजरी झाली.

या जयंतीनिमित्त एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांनी दफनभूमीवरील अतिक्रमणावर चर्चा केली, चांडोली येथे दुपारी एक वाजता कार्यकर्ते एकत्र आले. भर उन्हात झेंडे दाखवत ते दफनभूमी परिसरात आले. येथे असलेले कारखानदार, कामगार यांना चाहूल लागल्याने ते अगोदरच पळून गेले होते. आंदोलकांनी शेड जमीनदोस्त करीत थेट कारवाई केली. अनिल जाधव, किशोर डोळस, मंगेश जाधव, डॉ नीता आल्हाट, कांताराम सोनवणे, सुरेश सोनवणे, दत्ता गोतारने, मंगेश शिंदे, बाळु वाघमारे, नितेश वाघमारे, सिद्धार्थ भालेराव, पोपट शिंदे, दिलीप शिंदे, सविता शिंदे आदींसह जवळपास २०० कार्यकर्त्यांनी आंदोलनात सहभाग घेतला. शासकीय कार्यालयांना निवेदन देऊन, आंदोलन करून उपयोग झाला नसल्याच्या पार्श्वभूमीवर भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक विजय डोळस यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी थेट अतिक्रमण विरोधी कारवाई हातात घेऊन ठोक आंदोलन केले.

### दफनभूमीवरील अतिक्रमण हटवले

» चांडोली येथील मागासवर्गीय दफनभूमीवर झालेल्या अतिक्रमणाविरोधात भीम शक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी थेट कारवाई करत कारखान्याचे शेड जमीनदोस्त केले. सिमेंट खांब व इतर साहित्य तयार करणारा कारखाना येथे सुरू असल्याचे उघड झाले. अनेक निवेदने देऊनही प्रशासनाने कारवाई न केल्याने संतप्त कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबला.

### आंबेडकर प्रतिमेची स्थापना

» कारवाईनंतर कार्यकर्त्यांनी त्या जागी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विधिपूर्वक स्थापना केली. ही जागा मागासवर्गीय नागरिकांसाठी दफनभूमी म्हणून खुली करण्याचा संदेश देण्यात आला. यापूर्वीही २०१२ मध्ये या प्रकरणी आंदोलन झाले होते. मात्र पुन्हा अतिक्रमण झाल्याने कार्यकर्त्यांनी यावेळी थेट कारवाई करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

# नवले पुलावर पुन्हा वाढला धोका; अपघातस्थळी अनधिकृत पार्किंग

## भीषण दुर्घटनेनंतरही उपाययोजना अपुऱ्या; महामार्गावर ट्रक-बसमुळे अपघाताचा वाढता धोका

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-बंगळुरू महामार्गावरील नवले पुलावर गेल्या वर्षी 13 नोव्हेंबर रोजी काळजाचा थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला होता. त्याच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. ज्या ठिकाणी एकाच कुटुंबातील आठ सदस्यांचा जळून कोळसा झाला. मात्र, या अपघाताच्या गांभीर्याचा प्रशासनाला विसर पडल्याने त्याच 'ब्लॅक स्पॉट'सह नवले पूल परिसराला अनधिकृत पार्किंगचा विळखा पडल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

नवले पूल परिसरातील या भीषण अपघाताला सोमवारी (दि. 13) पाच महिने पूर्ण झाले. या प्रदीर्घ काळानंतर प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या, प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे, या पाहण्याच्या हेतूने दैनिक 'पुढारी'ने या भीषण अपघातस्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली असता, येथे महामार्गावरील रस्त्यावर अपघाताचा धोका आणखी गंभीर होत चालल्याचे दिसून आले.



नोव्हेंबर 2025 मधील त्या भीषण अपघातानंतर येथील सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने विविध उपाय योजल्याचे अनेक दावे प्रशासनाकडून करण्यात आले होते. मात्र, पाच महिन्यांनंतर येथे केलेल्या पाहणीत ज्या ठिकाणी अपघात झाला होता, तिथेच आता महामार्गाच्या कडेला अनधिकृत पार्किंग सुरू असल्याचे दिसून आले. येथे अनेक मोठमोठे ट्रक आणि कंटेनर भररस्त्यात उभे केले जात आहेत. त्याचबरोबर खासगी ट्रॅव्हल्स बस बिनधास्तपणे महामार्गावरच प्रवाशांची चढ-उतार करताना दिसून आले. परिणामी पुन्हा एखाद्या मोठ्या अपघाताला आमंत्रण दिले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पुणे-बंगळुरू महामार्गावरील नवले पुलावर गेल्या वर्षी 13 नोव्हेंबर रोजी काळजाचा थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला होता. त्याच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. ज्या ठिकाणी एकाच कुटुंबातील आठ सदस्यांचा जळून कोळसा झाला. मात्र, या अपघाताच्या गांभीर्याचा प्रशासनाला विसर पडल्याने त्याच 'ब्लॅक स्पॉट'सह नवले पूल परिसराला अनधिकृत पार्किंगचा विळखा पडल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

> 'नवले पुलावर झालेल्या त्या भीषण अपघाताने संपूर्ण पुणे हादरले होते. त्याच अपघातस्थळी महामार्गावर होणारे अनधिकृत पार्किंग हे मृत्यूला आमंत्रण देणारे आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.
>
> - कोमल नवले, स्थानिक नगरसेविका